असा. क्र. ३ रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००१

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

मंगळवार, जानेवारी २, २००१/पौष १२, शके १९२२

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

### अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक** ३.—जलसंधारण महामंडळ स्थापन करून महाराष्ट्र राज्यात, सामाजिक वनीकरण, पाटबंधारे प्रकल्प यांसह पाणलोट व जलसंधारण कामांचे प्रचालन, प्रवर्तन आणि शीघ्र विकास आणि नियमन करण्याकरिता विशेष तरतुदी करण्यासाठी अधिनियम. .. .. .. .. ७–२७

दिनांक १ जानेवारी २००१ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २ जानेवारी २००१ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**जलसंधारण महामंडळ स्थापन करून महाराष्ट्र राज्यात, सामाजिक वनीकरण, पाटबंधारे प्रकल्प यांसह पाणलोट व जलसंधारण कामांचे प्रचालन, प्रवर्तन आणि शीघ्र विकास आणि नियमन करण्याकरिता विशेष तरतुदी करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाची स्थापना करून महाराष्ट्र राज्यात सामाजिक वनीकरण व पाटबंधारे प्रकल्प यांसह पाणलोट व जलसंधारण कामांचे प्रचालन, प्रवर्तन आणि शीघ्र विकास आणि नियमन करण्याकरिता आणि त्यांच्याशी संबंधित इतर बाबींकरिता विशेष तरतूदी करणे इष्ट होते ;

आणि ज्याअर्थी, त्याकरिता तात्काळ कायदा करणे आवश्यक वाटले होते ;

आणि ज्याअर्थी, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त प्रयोजनांकरिता कायदा करण्यासाठी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, दिनांक २२ ऑगस्ट २००० रोजी महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अध्यादेश, २००० प्रख्यापित करण्यात आला ; २००० चा महा. अध्या. १३.

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

### प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अधिनियम, २००० असे म्हणावे.

(२) तो, अधिसूचित छावणी व नागरी क्षेत्रे वगळून, परंतु २५० हेक्टरपर्यंत जलप्रदाय क्षेत्र असलेल्या पाटबंधारे प्रकल्प योजनांचा समावेश करून, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो, दिनांक २२ ऑगस्ट २००० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

२. या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " उप-विधी " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले उप-विधी, असा आहे ;

(ख) " अध्यक्ष " याचा अर्थ, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचा अध्यक्ष, असा आहे ;

(ग) " महामंडळ " याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन केलेले महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, असा आहे ;

(घ) " पाटबंधारे प्रकल्प " याचा अर्थ, २५० हेक्टरपर्यंत जलप्रदाय क्षेत्र असलेल्या लहान पाटबंधारे प्रकल्प किंवा पाटबंधारे योजना, असा आहे आणि त्यामध्ये लाभक्षेत्र विकास आणि इतर संलग्न कार्यक्रम यांचा समावेश होतो ;

(ङ) " स्थानिक क्षेत्र " याचा अर्थ, स्थानिक मंडळाच्या अधिकारितेमध्ये येणारे क्षेत्र, असा आहे ;

(च) " स्थानिक संस्था " याचा अर्थ, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या संबंधित विधीद्वारे स्थापन करण्यात आलेली जिल्हा परिषद, किंवा पंचायत समिती किंवा ग्रामपंचायत, असा आहे ;

(छ) " व्यवस्थापकीय संचालक " याचा अर्थ, जो महामंडळाचा कर्मचारी आहे आणि ज्याची नियुक्ती राज्य शासनाने केली आहे, परंतु महामंडळाला दिलेल्या सेवेकरिता महामंडळ निधीतून ज्याला पारिश्रमिक मिळते असा कार्यकारी प्रमुख, असा आहे ;

(ज) " सदस्य " याचा अर्थ, महामंडळाचा सदस्य, असा आहे आणि त्यात महामंडळाच्या अध्यक्षाचा आणि उपाध्यक्षाचा समावेश होतो ;

(झ) " सदस्य-सचिव " याचा अर्थ, महामंडळाचा सदस्य-सचिव, असा आहे ;

(ञ) " अशासकीय सदस्य " याचा अर्थ, पदसिद्ध सदस्य नसलेला सदस्य, असा आहे ;

(ट) " जागा " याचा अर्थ, कोणतीही जमीन किंवा इमारत किंवा इमारतीचा एखादा भाग, असा आहे ;

(ठ) '' विहित '' याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे ;

(ड) '' विनियम '' याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले विनियम, असा आहे ;

(ढ) '' नियम '' याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेले नियम असा आहे ;

२००० चा महा. अध्या. १३. (ण) '' राज्य शासन '' किंवा '' शासन '' याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे.

(त) '' उपाध्यक्ष '' याचा अर्थ, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचा उपाध्यक्ष, असा आहे.

## प्रकरण दोन

## महामंडळाची स्थापना, कामकाज चालविणे व कर्मचारी वर्ग

महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाची स्थापना.

३. (१) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी '' महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ '' या नावाने संबोधण्यात यावयाच्या महामंडळाची स्थापना करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये स्थापन केलेले महामंडळ हे, एक निगम निकाय असेल आणि त्याची अखंड परंपरा असेल व त्याचा एक सामाईक शिक्का असेल, या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून, त्याला स्थावर व जंगम अशी दोन्ही प्रकारच्या मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा व ती निकालात काढण्याचा आणि करार करण्याचा अधिकार असेल, आणि त्याच्या निगम नावाने त्याला किंवा त्याच्यावर दावा लावता येईल.

(३) महामंडळाचे मुख्यालय औरंगाबाद येथे असेल.

महामंडळ घटित करणे.

४. (१) महामंडळ पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल :—

| | | |
|---|---|---|
| (क) जलसंधारण मंत्री | .. | पदसिद्ध अध्यक्ष ; |
| (ख) जलसंधारण राज्यमंत्री | .. | पदसिद्ध उपाध्यक्ष ; |
| (ग) कृषि मंत्री | .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (घ) पाटबंधारे मंत्री | .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (ङ) शासन सचिव, वित्त विभाग | .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (च) शासन सचिव, नियोजन विभाग | .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (छ) शासन सचिव, वन विभाग | .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (ज) शासन सचिव, कृषि विभाग | .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (झ) शासन सचिव, पाटबंधारे विभाग | .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (ञ) शासन सचिव, जलसंधारण विभाग/रोजगार हमी योजना. | | पदसिद्ध सदस्य ; |
| (ट) शासन सचिव, ग्रामविकास विभाग | .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (ठ) संचालक, महाराष्ट्र दूर संवेदना उपयोजन केंद्र, नागपूर. | | पदसिद्ध सदस्य ; |
| (ड) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे | .. | पदसिद्ध सदस्य ; |
| (ढ) व्यवस्थापकीय संचालक | .. | पदसिद्ध सदस्य ; |

(ण) महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे पाच सदस्य ;

(त) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य ;

(थ) पाटबंधारे क्षेत्राची विशेष माहिती व प्रत्यक्ष अनुभव असलेला, राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य ;

(द) आर्थिक क्षेत्राची विशेष माहिती असलेला, राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचा एक सदस्य ;

(ध) राज्य शासनाने नियुक्त करावयाचा सदस्य-सचिव, परंतु त्याला मत देण्याचा अधिकार असणार नाही.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियम प्रारंभाच्या दिनांकापासून, कोणत्याही वेळी, पोट-कलम (१) च्या खंड (क) ते (ड) मध्ये विनिर्दिष्ट केलेली पदे, त्या त्या वेळी धारण करणाऱ्या पदसिद्ध सदस्यांकडून, महामंडळाच्या सर्व अधिकारांचा वापर करण्यात येईल, त्याच्या कर्तव्यांचे पालन करण्यात येईल आणि त्याची कार्ये पार पाडण्यात येतील, आणि सर्व सदस्यांची किंवा त्यांपैकी इतर कोणत्याही सदस्याची त्यावेळेपुरती नियुक्ती केलेली असली किंवा नसली, तरीही, महामंडळ वैध रीतीने घटित केले असल्याचे मानण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) च्या खंड (ण), (त), (थ), (द) व (ध) अन्वये सदस्य म्हणून वेळोवेळी करण्यात आलेल्या नियुक्त्या **राजपत्रामध्ये** प्रसिद्ध करण्यात येतील.

(४) पोट-कलम (१) च्या खंड (ण), (त), (थ) व (द) अन्वये नामनिर्देशित केलेल्या महामंडळाच्या सदस्यांना विनियमांद्वारे विहित करण्यात येईल असे शुल्क व भत्ते मिळतील.

कार्यकारी समिती.

५. (१) पुढील सदस्यांचा समावेश असलेली एक कार्यकारी समिती असेल :—

(क) महामंडळाचा व्यवस्थापकीय संचालक .. अध्यक्ष ;

(ख) मुख्य अभियंता, पाटबंधारे प्रकल्प (स्थानिक क्षेत्र), पुणे सदस्य ;

(ग) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे .. सदस्य ;

(घ) संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे .. सदस्य ;

(ङ) महामंडळाचा मुख्य लेखा व लेखापरीक्षा अधिकारी .. सदस्य.

(२) व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य लेखा व लेखापरीक्षा अधिकारी यांच्या नेमणुका, राज्य शासन त्यास योग्य वाटेल अशा अटी व शर्तीनुसार करील.

(३) कार्यकारी समितीचे अधिकार, कार्ये आणि कर्तव्ये ही विनियमांद्वारे घालून दिली असतील त्याप्रमाणे असतील.

अशासकीय सदस्य होण्याच्या बाबतीतील अपात्रता आणि अशा सदस्याला काढून टाकणे.

६. (१) जर एखादी व्यक्ती,—

(क) नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असणाऱ्या एखाद्या अपराधाबद्दल दोषी ठरवण्यात आली असेल ;

(ख) अमुक्त नादार असेल ;

(ग) विकल मनाची असून एखाद्या सक्षम न्यायालयाकडून ती तशी असल्याचे जाहीर करण्यात आले असेल ;

(घ) कलम ७ मध्ये तरतूद केली असेल ते खेरीज करून महामंडळाचे कोणतेही लाभपद धारण करत असेल ;

(ङ) स्वतः किंवा कोणताही भागीदार, मालक किंवा कर्मचारी यांच्यामार्फत महामंडळाबरोबर, महामंडळाद्वारे किंवा महामंडळातर्फे केलेल्या कोणत्याही करारात किंवा कामात पैशाच्या किंवा इतर कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे हिस्साधारक किंवा हितसंबंधित असेल ; किंवा

(च) महामंडळाबरोबर, महामंडळाद्वारे किंवा महामंडळातर्फे केलेल्या कोणत्याही करारात किंवा कामात कोणत्याही प्रकारचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल, अशा कोणत्याही कंपनीचा संचालक, सचिव, व्यवस्थापक किंवा इतर अधिकारी असेल ;

तर ती व्यक्ती, अशासकीय सदस्य म्हणून नियुक्त केली जाण्यास किंवा असा सदस्य म्हणून राहण्यास अपात्र ठरेल :

परंतु,—

(एक) स्थावर मालमत्तेची कोणतीही विक्री, खरेदी, भाडेपट्टा किंवा अदलाबदल किंवा त्यासाठी केलेला कोणताही करारनामा ;

(दोन) पैसे कर्जाऊ घेण्यासाठी केलेला करारनामा किंवा केवळ पैसे देण्यासंबंधीची कोणतीही प्रतिभूती ;

(तीन) महामंडळाच्या कारभारासंबंधीची कोणतीही जाहिरात, ज्या कोणत्याही वृत्तपत्रात प्रसिद्ध केली असेल असे वृत्तपत्र ;

(चार) ती व्यक्ती किंवा कंपनी नियमितपणे जो व्यवसाय करते त्यातील कोणत्याही वस्तूची, एका वर्षात, दहा हजार रुपयांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या मूल्यापर्यंतची महामंडळाला केलेली प्रासंगिक विक्री ;

यामध्ये एखाद्या व्यक्तीचा किंवा ती ज्या कंपनीचा संचालक, सचिव, व्यवस्थापक किंवा अन्य अधिकारी आहे, त्या कंपनीचा हिस्सा किंवा हितसंबंध आहे, केवळ याच कारणावरून खंड (ङ) किंवा खंड (च) अन्वये अपात्र ठरणार नाही.

(२) राज्य शासनाच्या मते,—

(क) ज्यास पोट-कलम (१) अन्वये अपात्र ठरविण्यात आले आहे ;

(ख) जो काम करण्यास नकार देतो ;

(ग) ज्याने त्याचे महामंडळावर पुढे चालू राहणे जनतेच्या हिताच्या दृष्टीने हानिकारक ठरेल अशा प्रकारे सदस्य म्हणून असलेल्या आपल्या पदाचा दुरुपयोग केलेला आहे ; किंवा

(घ) अन्यथा जो सदस्य म्हणून राहण्यास अपात्र झाला आहे ;

अशा, शासनाने नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही अशासकीय सदस्याला शासन महामंडळातून काढून टाकू शकेल.

(३) पोट-कलम (२) खालील सदस्याला काढून टाकण्यासंबंधीचा कोणताही आदेश, त्या अशासकीय सदस्याला त्याचे स्पष्टीकरण शासनाला सादर करण्याची संधी देण्यात आल्याखेरीज काढण्यात येणार नाही आणि असा आदेश काढण्यात आला असेल त्या बाबतीत, अशा प्रकारे काढून टाकलेल्या सदस्याचे पद रिक्त असल्याचे मानण्यात येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये अशा प्रकारे ज्या सदस्याला काढून टाकण्यात आलेले असेल तो सदस्य महामंडळाचा सदस्य म्हणून किंवा अन्य कोणत्याही नात्याने फेरनियुक्तीस पात्र असणार नाही.

**सदस्यांचा पदावधी.**

७. (१) कलम ४ च्या पोट-कलम (१) च्या खंड (ण), (त), (थ) व (द) अन्वये सदस्य म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती, राज्य शासनाने राजपत्रातील अधिसूचनेद्वारे पदावधी अगोदरच समाप्त केला नसेल तर नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षांसाठी पद धारण करील :

परंतु, महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य जर महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य असण्याचे बंद झाले तर ते महामंडळाचे सदस्य असण्याचे देखील बंद होतील.

(२) सदस्य-सचिव, राज्य शासन आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करील अशा कालावधीसाठी पद धारण करील आणि त्यास विनिर्दिष्ट करील असे पारिश्रमिक मिळेल.

(३) सदस्य फेरनियुक्तीसाठी पात्र असतील.

(४) कोणत्याही सदस्यास, कोणत्याही वेळी राज्य शासनाला संबोधून आपल्या पदाचा सहीनिशी लेखी राजीनामा देता येईल आणि, असा राजीनामा स्वीकृत करण्यात आल्यावर, त्याचे पद रिक्त झाले असल्याचे मानण्यात येईल.

महामंडळाच्या बैठकी.

८. (१) अध्यक्ष ठरवील अशा वेळी आणि अशा ठिकाणी महामंडळाची बैठक होईल आणि त्या बैठकीत कामकाज पार पाडताना (गणपूर्ती धरून) विनियमांद्वारे घालून देण्यात येईल अशा कार्यनियमावलीचे पालन करण्यात येईल :

परंतु, प्रत्येक कॅलेंडर महिन्यात किमान एकदा अशा रीतीने बैठक घेण्यात येईल की, दोन बैठकींमधील कालावधी साठ दिवसांपेक्षा अधिक असणार नाही.

(२) अध्यक्ष, किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपाध्यक्ष, महामंडळाच्या प्रत्येक बैठकीत अध्यक्ष म्हणून काम पाहील. जर काही कारणाने अध्यक्ष व उपाध्यक्ष हे दोन्हीही बैठकीस उपस्थित राहू शकले नाही, तर बैठकीस उपस्थित असलेला सर्वात वरिष्ठ सदस्य-मंत्री अध्यक्ष म्हणून काम पाहील.

(३) महामंडळाचे सर्व कामकाज अध्यक्षाकडून अधिप्रमाणित करण्यात येईल आणि महामंडळाचे सर्व आदेश व विलेख, व्यवस्थापकीय संचालकाकडून किंवा या बाबतीत विनियमाद्वारे प्राधिकृत केले असेल त्याप्रमाणे महामंडळाच्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याकडून अधिप्रमाणित करण्यात येतील.

हितसंबंधामुळे महामंडळाच्या किंवा समितीच्या कामकाजामधील सहभागासाठी अपात्रता.

९. (१) महामंडळाने किंवा त्याच्या वतीने केलेला किंवा करावयाचे प्रस्तावित केलेला कोणताही करार, कर्ज, व्यवस्था किंवा प्रस्ताव यांच्याशी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित किंवा हितसंबंधित असलेला एखादा सदस्य, संधी मिळताच लवकरात लवकर त्याच्या हितसंबंधाचे स्वरूप महामंडळास विशद करील आणि महामंडळाच्या कोणत्याही बैठकीस, ज्यावेळी असा करार, कर्ज, व्यवस्था किंवा प्रस्ताव यावर चर्चा होईल त्यावेळी, माहिती मिळविण्यासाठी इतर सदस्यांना त्याची उपस्थिती आवश्यक वाटल्याशिवाय उपस्थित राहणार नाही, मात्र अशा प्रकारे उपस्थित राहण्यास सांगण्यात आलेला असा कोणताही सदस्य असा कोणताही करार, कर्ज, व्यवस्था किंवा प्रस्ताव यावर मतदान करणार नाही.

(२) या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी जमीन संपादन करण्याचे प्रस्तावित केलेल्या कोणत्याही क्षेत्रामध्ये महामंडळाच्या किंवा महामंडळाने नियुक्त केलेल्या समितीच्या कोणत्याही सदस्याचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणताही हितसंबंध असेल तर तो अशा जमिनीसंबंधीची बाब ज्या बैठकीत विचारात घेण्यांत येईल अशा महामंडळाच्या किंवा त्याच्या समितीच्या कोणत्याही बैठकीमध्ये सहभागी होणार नाही.

(३) पोट-कलम (१) किंवा (२) मधील कोणत्याही गोष्टीमुळे महामंडळाच्या किंवा त्याच्या समितीच्या कोणत्याही सदस्यास, कोणत्याही ठरावावर किंवा उक्त पोट-कलमांमध्ये निर्दिष्ट केलेल्या विषयांव्यतिरिक्त कोणत्याही विषयाशी संबंधित प्रश्नावर मतदान करण्यास किंवा त्यावरील चर्चेत सहभागी होण्यांस प्रतिबंध होणार नाही :

परंतु, अशा कोणत्याही कराराशी, कर्जाशी, व्यवस्थेशी किंवा प्रस्तावाशी संबंधित अशा कंपनीचा केवळ भागधारक असल्याच्या कारणावरूनच एखाद्या सदस्याचा वर निर्देश केल्याप्रमाणे संबंध वा हितसंबंध असल्याचे मानले जाणार नाही.

समित्या घटित करणे.

१०. महामंडळ, वेळोवेळी त्याच्या सदस्यांमधून त्यास योग्य वाटेल एवढ्या सदस्यांची मिळून समिती किंवा समित्या घटित करील आणि अशा समितीकडे किंवा समित्यांकडे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी त्यास योग्य वाटतील असे अधिकार सोपवू शकेल.

११. (१) महामंडळास किंवा त्याच्या कोणत्याही समितीस कोणत्याही बाबीच्या किंवा बाबींच्या संबंधात सहाय्य करण्यासाठी किंवा सल्ला देण्यासाठी विशेष निमंत्रित म्हणून त्याच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी केंद्र सरकारच्या, राज्य शासनाच्या, स्थानिक संस्थेच्या किंवा कोणत्याही संघटनेच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कोणत्याही व्यक्तीस, बोलविता येईल. अशा निमंत्रित अधिकाऱ्यास किंवा व्यक्तीस कामकाजात भाग घेता येईल, मात्र त्याला मतदान करण्याचा हक्क असणार नाही. शासनाचे किंवा स्थानिक संस्थेचे अधिकारी इत्यादींना बोलावण्यासंबंधी तरतूद.

(२) अशा निमंत्रित केलेल्या अधिकाऱ्यास, महामंडळाच्या किंवा त्याच्या कोणत्याही समितीच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी होणारा वैयक्तिक खर्च भागविता यावा म्हणून, महामंडळ, वेळोवेळी ठरवील असे मानधन किंवा पूरक भत्ता मिळण्याचा अधिकार असेल.

१२. महामंडळाच्या सदस्याचे कोणतेही रिक्त पद, व्यवहार्य असेल तितक्या लवकर, जणू ही नियुक्ती प्रथमतः करण्यात येत होती असे समजून त्याच रीतीने भरण्यात येईल. नैमितिक रिक्त पद.

१३. या अधिनियमानुसार महामंडळाने किंवा महामंडळाने नियुक्त केलेल्या कोणत्याही समितीने केलेले कोणतेही कृत्य किंवा हाती घेतलेली कार्यवाही ही केवळ,— पद रिक्त असणे, अनौपचारिकता असणे, इत्यादींमुळे कृती किंवा कार्यवाही विधिअग्राह्य न ठरणे.

(क) कोणत्याही सदस्याचे पद रिक्त आहे किंवा महामंडळाच्या किंवा महामंडळाच्या समितीच्या स्थापनेमध्ये, घटनेमध्ये किंवा पुनःस्थापनेमध्ये कोणताही दोष आहे ; किंवा

(ख) महामंडळाचा किंवा त्याच्या समितीचा सदस्य म्हणून नियुक्ती होण्यामध्ये दोष अथवा अनियमितता आहे ; किंवा

(ग) मूळ विषयावर परिणाम न करणारा असा कोणताही दोष अथवा अनियमितता अशा कृतीमध्ये किंवा कार्यवाहीमध्ये आहे,

या कारणास्तव, विधिअग्राह्य ठरणार नाही.

१४. (क) महामंडळास आपली कर्तव्ये व कामे कार्यक्षमरीत्या पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील असे, इतर अधिकारी व कर्मचारी यांची शासनाच्या पूर्वमंजुरीने नियुक्ती करता येईल ; महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी.

(ख) अधिकारी व सेवक यांच्या नियुक्तीच्या शर्ती वेळोवेळी विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येतील ;

(ग) महामंडळाच्या अधीक्षणाला अधीन राहून, व्यवस्थापकीय संचालक, महामंडळावर प्रतिनियुक्तीवर नेमणूक केलेल्या शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांसह त्याच्या सर्व अधिकाऱ्यांवर आणि कर्मचाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवील.

## प्रकरण तीन

### मालमत्ता, मत्ता व दायित्वे, व बंधने निहित असणे, आणि कर्मचाऱ्यांच्या बदल्या

१५. (१) राज्य शासनाकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिनांकापासून (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश " नेमून दिलेला दिनांक " असा करण्यात आला आहे),— महामंडळाकडे मालमत्ता निहित करणे व हस्तांतरित करणे.

(क) नेमून दिलेल्या दिनांकाच्या लगतपूर्वी ज्या राज्य शासनाकडे किंवा स्थानिक संस्थांकडे निहित होत्या आणि जलसंधारण विभागाच्या किंवा स्थानिक संस्थांच्या नियंत्रणाखाली होत्या

अशा महामंडळाच्या कार्यक्षेत्रातील स्थावर व जंगम मालमत्तांचा समावेश असलेल्या म्हणजेच त्या बाबतीत विनिर्दिष्ट करण्यात आलेले पाटबंधारे प्रकल्प आणि मृदसंधारणाची कामे, सामाजिक वनीकरणाची कामे, बांधकाम चालू असलेली कामे आणि पूर्ण झालेल्या योजनांचे व्यवस्थापन यांसह असलेल्या मालमत्ता व मत्ता महामंडळाकडे निहित होतील आणि त्याकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या असतील आणि त्या बाबतीत मिळालेले सर्व उत्पन्न आणि केलेला सर्व खर्च हा महामंडळाच्या लेख्यावर आणण्यात येईल, आणि

(ख) उक्त प्रकल्पांसंबंधीतील राज्य शासनाचे किंवा स्थानिक संस्थांचे हक्क, दायित्वे व बंधने ही, मग ती कोणत्याही करारामुळे उद्‌भवलेली असोत किंवा अन्य प्रकारे संबंधित असोत, महामंडळाचे हक्क, दायित्वे व बंधने म्हणून मानण्यात येतील ;

(२) अशी मालमत्ता, मत्ता, हक्क, दायित्वे व बंधने यांचे मूल्य राज्य शासन निर्धारित करील अशा रीतीने करण्यात येईल.

(३) महामंडळाकडे सोपविलेले पाटबंधारे प्रकल्प, मृदसंधारणाची कामे, सामाजिक वनीकरणाची कामे यांच्या विकासाच्या कोणत्याही योजनांसंबंधात, नेमून दिलेल्या दिनांकापूर्वी राज्य शासनाविरुद्ध दाखल करण्यात आलेले किंवा राज्य शासनाकडून बचाव करण्यात आलेले सर्व दावे व इतर कायदेशीर कार्यवाही महामंडळाविरुद्ध चालू ठेवण्यात येईल किंवा दाखल करण्यात येईल किंवा महामंडळाकडून तिचा बचाव करण्यात येईल.

विवादग्रस्त मालमत्तेबाबतचा निर्णय.

**१६.** कोणतीही मालमत्ता किंवा मत्ता, कलम १५ अन्वये महामंडळाकडे निहित झालेली आहे किंवा कसे किंवा कोणतेही हक्क, दायित्वे किंवा बंधने ही, त्या कलमान्वये महामंडळाचे हक्क, दायित्वे किंवा बंधने झाली आहेत किंवा कसे या संबंधात कोणतीही शंका अथवा विवाद उद्‌भवेल त्याबाबतीत अशी शंका अथवा विवाद राज्य शासनाकडे निर्णयार्थ पाठविण्यात येईल आणि राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

अधिकारी व कर्मचारी यांची प्रतिनियुक्ती.

**१७.** (१) ज्या बाबतीत या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये कोणतेही अधिकार, कर्तव्ये आणि कार्ये महामंडळाकडे सोपवल्याच्या परिणामी, राज्य शासनाच्या मते राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या तारखेस, महामंडळाच्या कार्यक्षेत्रामधील राज्य क्षेत्र, पाटबंधारे प्रकल्प, मृदसंधारणाची कामे, सामाजिक वनीकरणाची कामे यांचे नियोजन, अन्वेषण, संकल्पचित्रण, बांधकाम, व्यवस्थापन आणि भूविकास या क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या शासनाच्या जलसंधारण विभागातील कोणताही क्षेत्रीय आस्थापना कर्मचारी म्हणजेच, तांत्रिक कर्मचारीवर्गातील अधिकारी व कर्मचारी तसेच लिपिकवर्गीय व लिपिकवर्गेतर कर्मचारी (स्थायी, नियमित, अस्थायी, नियमित स्थायी म्हणून रूपांतरित, अस्थायी आणि रोजंदारीवरील) हे राज्य शासनाच्या आवश्यकतांपेक्षा संपूर्णपणे किंवा अंशतः अतिरिक्त झालेले असतील किंवा होण्याची शक्यता असेल, त्या बाबतीत किंवा महामंडळास आपले अधिकार कार्यक्षमपणे वापरता यावेत, आपली कर्तव्ये आणि कार्ये पार पाडता यावीत यासाठी त्यास अशा अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवा आवश्यक असतील त्या बाबतीत राज्य शासनास, राज्य शासनाच्या विभागाच्या प्रमुखास किंवा राज्य शासनाकडून या बाबतीत प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास त्या संबंधातील गरजा लक्षात घेऊन, वेळोवेळी, आदेशाद्वारे अशा अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना महामंडळाकडे प्रतिनियुक्तीवर पाठविता येईल आणि महामंडळ, या कलमाच्या तरतुदीस अधीन राहून त्यांचा स्वीकार करील व त्यांना प्रतिनियुक्तीवर नेमील.

(२) अशा कोणत्याही कर्मचाऱ्यांचा महामंडळाकडील प्रतिनियुक्तीचा कालावधी हा, अशा कोणत्याही व्यक्तीस, पदोन्नती, पदावनती, सेवासमाप्ती किंवा नियत सेवावधी यांसारख्या कारणामुळे किंवा राज्य शासनाकडून निदेश देण्यात येईल अशा कोणत्याही अन्य कारणांमुळे प्रत्यावर्तित करणे आवश्यक असेल ते खेरीज करून, इतर बाबतीत पाच वर्षांचा असेल. प्रतिनियुक्तीचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, तो राज्य शासनाच्या सेवेत प्रत्यावर्तित झालेला असेल.

(३) पोट-कलम (२) अन्वये महामंडळाकडे प्रतिनियुक्तीवर बदली करण्यात आलेल्या उक्त आस्थापनेच्या सर्व स्थायी आणि नियमित तात्पुरत्या स्थायी कर्मचाऱ्यांना, राज्य शासनाच्या सेवेतील त्यांच्या पदांवर धारणाधिकार असेल आणि महामंडळाकडील त्यांचा सेवेचा कालावधी ते राज्य शासनाच्या सेवेत परत आल्यानंतर त्यांच्या वेतनवाढी, निवृत्तिवेतने व त्यांच्या सेवेसंबंधातील इतर बाबी यांसाठी हिशेबात घेण्यात येईल.

(४) महामंडळाला, अधिकारी व कर्मचारी याची महामंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये बदली करण्याचा प्राधिकार असेल.

परंतु, कार्यकारी अभियंत्याच्या दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत आणि कार्यकारी अभियंत्यांच्या व त्यावरील श्रेणीतील इतर अधिकाऱ्यांच्या बाबतीत बदल्यांचे आदेश, राज्य शासनाच्या मान्यतेनंतरच अंमलात येतील.

(५) महामंडळाकडे प्रतिनियुक्तीवर असलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्यास कोणताही प्रतिनियुक्ती भत्ता मिळण्याचा हक्क असणार नाही.

(६) महामंडळाकडे प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते महामंडळाच्या निधीतून देण्यात येतील.

(७) या कलमात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त अन्य बाबतीत, महामंडळाकडे प्रतिनियुक्तीवर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या प्रतिनियुक्तीच्या लगतपूर्वी त्यास लागू असलेल्या अटी व शर्तीपेक्षा कमी लाभदायक असणार नाहीत आणि राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने असेल त्या व्यतिरिक्त त्यात त्यांचे अहित होईल अशा प्रकारे फेरबदल करण्यात येणार नाही.

## प्रकरण चार
## महामंडळाची कार्ये व अधिकार

१८. महामंडळाची कार्ये पुढीलप्रमाणे असतील :—

महामंडळाची कार्ये.

(क) राज्य शासनाने प्रकाशित केलेल्या धोरणांशी अनुरूप असे जलसंधारण, पाटबंधारे, मृदसंधारण, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, सामाजिक वनीकरण यांसाठी योजना तयार करणे, त्यांचे प्रचालन करणे, त्या कार्यान्वित करणे व त्यांसाठी वित्त पुरवठा करणे ;

(ख) जलसंधारण, पाटबंधारे, मृदसंधारण, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, सामाजिक वनीकरण यासंबंधी राज्य शासनास व स्थानिक संस्थांना आवश्यक त्या सर्व सेवा पुरविणे आणि तसेच, संस्थांना किंवा व्यक्तींना त्यांच्या विनंतीवरून प्रदानावर आधारित सेवा पुरविणे ;

(ग) राज्य शासनाच्या निदेशांशी अनुरूप असे जलसंधारण, पाटबंधारे, मृदसंधारण, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, सामाजिक वनीकरण यासाठी राज्य आराखडाचे प्रारूप तयार करणे ;

(घ) महामंडळाच्या व ज्यांनी महामंडळाबरोबर करार केलेला आहे अशा स्थानिक संस्थांच्या क्षेत्रांमध्ये अंमलात असलेल्या कोणत्याही पाणलोट क्षेत्र विकास योजनेखाली ज्याचा विकास झाला आहे अशा पाणलोट क्षेत्रामध्ये स्थित असलेल्या विहिरींचे पुनर्भरण झाल्यामुळे त्याचा लाभ झालेल्या शेतकऱ्यांवर बसवावयाचे कर व शुल्क, पाणीपट्टी, इत्यादींचे पुनर्विलोकन करणे व त्याबाबतीत सल्ला देणे ;

(ङ) साहित्यांच्या आवश्यकतेबाबत अंदाज करणे, त्यांचे प्रापण व वापर यासाठी व्यवस्था करणे ;

(च) राज्यातील जलसंधारणासंबंधी व त्यासंबंधीच्या इतर सर्व कार्यक्रमांसंबंधी मनुष्यबळ व त्यांचे प्रशिक्षण याच्या आवश्यकतेबाबत अंदाज करणे ;

(छ) महामंडळाची कर्तव्ये व कार्ये यांचे कार्यक्षमतेने पालन करण्यासाठी उपयोजित संशोधन करणे ;

(ज) पाणलोट क्षेत्रातील जलसंधारण प्रकल्पांच्या योजना आखणे, त्यांचे अन्वेषण, संकल्पचित्रण, बांधकाम आणि व्यवस्था करणे ;

(झ) या अधिनियमान्वये मत्ता व दायित्वे यांसह महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आलेली कार्ये आणि कोणत्याही अन्य बाबी यांच्या संबंधात करार करणे ;

(ञ) महामंडळाच्या कामांच्या प्रयोजनांसाठी निविदा, बोली, देकार मागवणे आणि करार करणे ;

(ट) पाणलोट क्षेत्र विकास प्रकल्पांच्या योजनांची आखणी, अन्वेषण, संकल्पचित्रण, बांधकाम आणि व्यवस्थापन यांमध्ये कोणत्याही व्यक्तीच्या किंवा संस्थेच्या किंवा व्यक्तींच्या संघटनेच्या—मग ती विधी संस्थापित असो किंवा नसो—सहभागास उत्तेजन देणे ;

(ठ) महामंडळ ज्यासाठी स्थापन झाले असेल ती प्रयोजने साध्य करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित सर्व बाबींसाठी अन्य निगम निकाय किंवा संस्था यांच्याबरोबर किंवा शासन किंवा स्थानिक संस्था यांच्याबरोबर संयुक्तपणे किंवा एजन्सी तत्त्वावर योजना किंवा कामे हाती घेणे ;

(ड) मत्स्यव्यवसाय, मत्स्यसंवर्धन, पुष्पसंवर्धन, फलोत्पादन, रेशीम उत्पादन, इत्यादींसारख्या पाटबंधाऱ्यांशी संबंधित कामांना चालना देणे ;

(ढ) वार्षिक योजना आणि पंचवार्षिक कार्यकारी विकास योजना तयार करणे ;

(ण) वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे ;

(त) महामंडळ ज्याच्यासाठी स्थापन झाले आहे ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राज्य शासनाने सोपविलेली रोजगार हमी योजनेखालील कामे यासह कोणतीही इतर कामे हाती घेणे.

महामंडळाचे सर्वसाधारण अधिकार.

**१९.** (१) महामंडळाला प्रशासकीय मान्यता देण्याचा, सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा, तांत्रिक मंजुरी देण्याचा, सर्व निविदांच्या संबंधात स्वीकृती देण्याचा, अर्थसंकल्पाला मंजुरी देण्याचा व वित्तीय तरतुदी करण्याचा, करारातून उद्भवलेल्या विवादांच्या बाबतीत समझोता करण्याचा आणि या अधिनियमाखालील त्याची कामे पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक किंवा इष्ट असतील अशा कोणत्याही अन्य गोष्टी करण्याचा, अधिकार असेल.

भाग चार]

अधि

१९६१ चा महा. २४.

१८९४ चा १.

भाग चार—

(२) पूर्वगामी तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न येता, अशा अधिकारांमध्ये खालील अधिकारांचा समावेश असेल :—

(क) महामंडळाने कार्यान्वित केलेल्या जलसंधारणाच्या, पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाच्या, सामाजिक वनीकरणाच्या आणि जी स्थानिक संस्थांच्या नियंत्रणाखाली आहेत अशा कामांसह सर्व कामासंबंधी शक्य त्या सर्व उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी निरीक्षण करणे व निदेश देणे ;

(ख) महामंडळास आवश्यक वाटेल त्याप्रमाणे कोणत्याही स्थानिक संस्थेकडून व कार्यचालन एजन्सीकडून नियतकालिक किंवा विनिर्दिष्ट माहिती मिळविणे ;

(ग) त्याच्या स्वतःच्या कर्मचारीवर्गास त्याचप्रमाणे, स्थानिक संस्थांच्या कर्मचाऱ्यांस प्रशिक्षण देणे ;

(घ) महामंडळाकडून राज्य शासनास, स्थानिक संस्थांस, संस्थांना किंवा व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या सर्व प्रकारच्या सेवांच्या शुल्काची व इतर आकारांची अनुसूची निर्धारित करणे ;

(ङ) महामंडळास त्याच्या कार्यांपैकी कोणतीही कार्ये, कर्तव्ये, कृती पार पाडण्यासाठी आवश्यक वाटेल अशी जंगम व स्थावर अशा दोन्ही प्रकारच्या मालमत्ता संपादन करणे, धारण करणे आणि धारण केलेली कोणतीही मालमत्ता महामंडळास योग्य वाटेल अशा अटीवर भाडेपट्ट्याने देणे, विकणे, तिची देवाण-घेवाण करणे किंवा अन्यप्रकारे तिचे हस्तांतरण करणे ;

(च) जलाशयांमध्ये किंवा जल प्रवाहांमध्ये माशांचा साठा करणे, मासे किंवा मच्छीमारीसंबंधी हक्क विकणे आणि त्याच्या नियंत्रणाखालील पाण्यातून मासे काढण्यास मनाई करणे ;

१९६१ चा महा. २४. (छ) महामंडळाने उपलब्ध करून दिलेल्या सुविधांचा चांगल्या प्रकारे वापर करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अनुसार जलउपयोजक संघ आणि अन्य संघटना यांच्या स्थापनेसाठी सहाय्य करणे ;

(ज) महामंडळाला आपली कार्ये पार पाडण्यास सहाय्य करण्यासाठी योग्य अर्हताप्राप्त संमंत्रकाची किंवा विशेष ज्ञान किंवा कौशल्य असणाऱ्या व्यक्तीची नेमणूक करणे ;

(झ) ज्याकरिता महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे अशा उद्दिष्टांना चालना देण्यासाठी आवश्यक असतील अशा कोणत्याही बाबींकरिता आवश्यक किंवा आनुषंगिक किंवा हितावह असतील अशा इतर गोष्टी करणे व अशी सर्व कामे पार पाडणे.

## प्रकरण पाच

## भूमि संपादन

१८९४ चा १. **२०.** राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी भूमि संपादन अधिनियम, १८९४ अन्वये सक्तीने भूमि संपादन करता येईल आणि कोणत्याही उक्त प्रयोजनासाठी संपादन करण्यात आलेली कोणतीही जमीन, या अधिनियमाच्या अर्थांतर्गत सार्वजनिक प्रयोजनार्थ संपादन करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल. भूमि संपादन.

**२१.** (१) या अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पुरःसरणार्थ राज्य शासनास, राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध करून, त्याद्वारे, शासन व महामंडळ यामध्ये मान्य करण्यात येतील अशा शर्तीवर, राज्य शासनाकडे निहित असतील अशा कोणत्याही जमिनी महामंडळाच्या स्वाधीन करता येतील : शासनाची जमीन महामंडळाकडे हस्तांतरित करणे.

परंतु, राज्य शासन, अधिसूचित करण्यात आलेल्या आणि राखीव वनांमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही जमिनी महामंडळाकडे सुपूर्द करणार नाही.

(२) अशा प्रकारे कोणतीही जमीन महामंडळाकडे सोपविण्यात आल्यानंतर, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम किंवा विनियम यांच्या तरतुदींनुसार आणि त्यासंबंधात राज्य शासनाकडून कोणतेही निदेश दिले गेले असतील तर त्या निदेशानुसार महामंडळाकडून तिच्याबाबत कार्यवाही केली जाईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये महामंडळाच्या स्वाधीन असलेल्या कोणत्याही जमिनीची महामंडळास आवश्यकता नसेल तर राज्य शासन महामंडळास परस्परात मान्य होतील अशा अटींवर व शर्तींवर ती जमीन परत करायला सांगू शकेल.

जमीन निकालात काढण्याचे महामंडळाचे अधिकार.

२२. राज्य शासनाने या अधिनियमाखाली तयार केलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून, महामंडळ या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशा रीतीने या महामंडळाकडे निहित असलेली कोणतीही जमीन, कोणतीही इमारत किंवा इतर मालमत्ता ठेवून घेईल, भाडेतत्त्वावर देईल, विकील, अदलाबदल करील किंवा ती अन्य प्रकारे निकालात काढील.

## प्रकरण सहा

## वित्त व्यवस्था, लेखे आणि लेखापरीक्षा

महामंडळाच्या मत्ता, इत्यादींचा विनियोग.

२३. महामंडळाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, निधी आणि इतर मत्ता, महामंडळाकडून या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी धारण केली जाईल आणि वापरली जाईल.

महामंडळाचा निधी.

२४. (१) महामंडळाकडे आपला स्वतःचा निधी असेल व ते त्याचे परिरक्षण करील ; त्या निधीत,—

(क) अनुदान, अर्थसहाय्य, कर्जे, आगाऊ रकमा यांद्वारे राज्य शासनाकडून आणि या अधिनियमाखाली उभारलेल्या कर्जातून महामंडळास प्राप्त झालेल्या सर्व रकमा ;

(ख) जमिनी, इमारती आणि अन्य स्थावर व जंगम मालमत्ता यांच्या विल्हेवाटीद्वारे आणि इतर व्यवहारांद्वारे महामंडळास प्राप्त झालेल्या सर्व रकमा ;

(ग) भाडे आणि नफा यांद्वारे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने महामंडळास प्राप्त झालेल्या सर्व रकमा,

जमा करण्यात येतील.

(२) महामंडळाला, स्टेट बँकेमध्ये किंवा राज्य शासनाने या बाबतीत मान्यता दिलेल्या अन्य कोणत्याही बँकेमध्ये चालू किंवा ठेव खाती ठेवता येईल.

(३) या बाबतीत महामंडळाकडून प्राधिकृत करण्यात येईल अशा अधिकाऱ्यांना अशा खात्यांचे व्यवहार करता येतील.

(४) पोट-कलम (२) व (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महामंडळास, आपल्या दैनंदिन व्यवहारासाठी, विहित करण्यात येईल अशा मर्यादेस आणि शर्तीस अधीन राहून त्यास योग्य वाटेल अशी रक्कम हाती ठेवता येईल.

*महामंडळाच्या निधीस शासनाचे अंशदान.*

२५. (१) राज्य शासन यासंबंधात वेळोवेळी यथोचितरीत्या केलेल्या विनियोजनाद्वारे या अधिनियमाखाली महामंडळाला आपली कामे पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या भांडवलातील राज्य शासनाचा हिस्सा म्हणून, महामंडळाच्या निधीमध्ये रुपये २,००० कोटी एवढ्या एकूण रकमेची तरतूद करील आणि असे अंशदान महामंडळाच्या स्थापनेच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीमध्ये योग्य हप्त्यांमध्ये विभागून देण्यात येईल :

परंतु असे की, राज्य शासन यासंबंधात योग्यरित्या करावयाच्या विनियोजनाद्वारे, महामंडळाच्या निधीमध्ये प्रारंभी अंशदान म्हणून रुपये ५०० कोटी एवढी रक्कम भरील :

परंतु आणखी असे की, शासनाकडून देण्यात आलेले उपरोक्त अंशदान, महामंडळाच्या स्थापनेकरिता आणि स्थापनेच्या संबंधात शासनाकडून करण्यात आलेला खर्च वगळून असेल.

(२) राज्य शासनाकडून तरतूद करण्यात आलेल्या भांडवलावर कोणतेही व्याज देय असणार नाही.

*महामंडळाला अनुदाने, अर्थसहाय्य, कर्जे आणि आगाऊ रकमा देणे.*

२६. राज्य शासन राज्य विधानमंडळाने याबाबतीत कायद्याद्वारे यथोचित विनियोजन केल्यानंतर, या अधिनियमाखालील महामंडळाची कार्ये पार पाडण्यासाठी शासनाला आवश्यक वाटतील अशी अनुदाने, अर्थसहाय्ये, कर्जे आणि आगाऊ रकमा महामंडळास देईल आणि अशी अनुदाने, अर्थसहाय्ये, कर्जे आणि आगाऊ रकमा या राज्य शासन निर्धारित करील अशा अटींवर व शर्तींवर देण्यात येतील.

*महामंडळाचे कर्ज घेण्याचे अधिकार.*

२७. (१) महामंडळाला स्वतःसाठी पुरेशा साधनसंपत्तीची तरतूद करण्याच्या प्रयोजनासाठी त्याला याबाबतीत शासनाकडून विहित करण्यात येतील अशा शर्तींस अधीन राहून वित्तीय संस्थांकडून किंवा अनिवासी भारतीयांकडून किंवा खुल्या बाजारातून किंवा हमी घेतलेली किंवा हमी न दिलेली बंधपत्रे, ऋणपत्रे, रोखे, मुदती ठेवी, हुंडी वटवून किंवा अन्यप्रकारे पैसे कर्जाऊ घेता येतील.

(२) राज्य शासनाने, या प्रयोजनासाठी उच्चतर कमाल रक्कम निश्चित केली नसेल तर, महामंडळाला कोणत्याही वेळी, पोट-कलम (१) अन्वये रुपये एक हजार कोटी इतकी कमाल रक्कम कर्जाऊ घेता येईल.

*महामंडळाने ठेवी स्वीकारणे.*

२८. या अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पुष्ट्यर्थ, ज्यांना जमीन किंवा इमारती किंवा मच्छिमारीचे हक्क नेमून देण्यात किंवा विकण्यात आले आहेत किंवा नेमून देण्याची किंवा विकण्याची शक्यता आहे अशा व्यक्ती, प्राधिकरणे किंवा संस्था यांच्याकडून महामंडळाला योग्य वाटतील अशा शर्तींवर ठेवी स्वीकारता येतील.

*खर्च करण्याचा अधिकार.*

२९. (१) महामंडळाला, कलम २४ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या महामंडळाच्या सर्वसाधारण निधींमधून किंवा, यथास्थिति, कलम ३० मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या राखीव आणि इतर निधींमधून या अधिनियमाखाली प्राधिकृत करण्यात आलेल्या प्रयोजनांसाठी त्याला योग्य वाटतील अशा रकमा खर्च करण्याचा प्राधिकार असेल.

(२) महामंडळ, जलसंधारण कामाव्यतिरिक्त, या अधिनियमान्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या उद्दिष्टांवर देखील त्याला योग्य वाटेल अशी रक्कम खर्च करण्यास सक्षम असेल आणि अशी रक्कम, महामंडळाच्या निधीतून देण्यात येणारा सामान्य खर्च म्हणून मानण्यात येईल.

*राखीव व इतर निधी.*

३०. (१) महामंडळ, राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल अशा राखीव आणि इतर विशेषरित्या अभिधान देण्यात आलेल्या निधींसाठी तरतूद करील.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या निधींची व्यवस्था, वेळोवेळी निधीच्या खाती हस्तांतरित करावयाची रक्कम आणि त्यामध्ये समाविष्ट असलेल्या पैशाचे विनियोजन महामंडळ त्याबाबतीत राज्य शासनाने दिलेल्या निदेशांना, असल्यास, अधीन राहून, निर्धारित करील.

**महामंडळाचा अर्थसंकल्प सादर करणे.**

**३१.** (१) महामंडळाचा व्यवस्थापकीय संचालक, प्रत्येक वर्षाच्या ऑक्टोबर महिन्यामध्ये घेण्यात यावयाच्या विशेष बैठकीत महामंडळाचा पुढील वर्षाचा अर्थसंकल्पीय अंदाज महामंडळापुढे ठेवील.

(२) असा प्रत्येक अर्थसंकल्पीय अंदाज, राज्य शासन वेळोवेळी आदेशाद्वारे, निर्धारित करील अशा नमुन्यामध्ये तयार करण्यात येईल आणि त्यामध्ये,—

(एक) पुढील वर्षात ज्यांची अंशतः किंवा पूर्णपणे अंमलबजावणी महामंडळाला करावयाची आहे असा प्रस्ताव, योजना आणि प्रकल्प यासाठी ;

(दोन) महामंडळाच्या सर्व दायित्वांची योग्य प्रकारे परिपूर्ती करण्यासाठी ; आणि

(तीन) या अधिनियमाच्या तरतुदींचे कार्यान्वयन करण्यासाठी तरतूद करण्यात आलेली असेल, अशा अंदाजामध्ये, पुढील वर्षाच्या भांडवली व महसुली लेख्यांवरील अंदाजित उत्पन्न व खर्च दाखविणारे विवरणपत्र आणि राज्य शासन निदेश देईल त्याप्रमाणे महामंडळाचे वित्तीय कार्य दर्शविणारा इतर तपशील अंतर्भूत असेल. अर्थसंकल्प, वित्तीय खर्च व केलेले काम यासंबंधीचे स्पष्ट चित्र उभे करणारा असेल.

**अर्थसंकल्पीय अंदाजास मंजुरी देणे.**

**३२.** कलम ३१ अन्वये सादर करण्यात आलेले अर्थसंकल्पीय अंदाज महामंडळ विचारात घेईल आणि राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील अशा तारखेस किंवा तारखेपूर्वी फेरफारांसह किंवा फेरफारांशिवाय ते मान्य करील.

**शासन हमीदार म्हणून असणे.**

**३३.** राज्य शासन, महामंडळाला दिलेल्या किंवा महामंडळाकडे हस्तांतरित केलेल्या कोणत्याही कर्जाची किंवा कर्ज रोख्यांची परतफेड करण्यास किंवा सर्व किंवा कोणत्याही कर्जावरील अथवा कर्ज रोख्यांवरील व्याजाचे प्रदान करण्यास, हमीदार राहू शकेल.

**नफा आणि तोट्याची विल्हेवाट लावणे.**

**३४.** (१) या अधिनियमाच्या कलम ३६, पोट-कलम (२) च्या तरतुदींस अधीन राहून, प्रत्येक उद्दिष्टामुळे कोणताही निव्वळ नफा मिळत असेल तर, तो पूर्णपणे महामंडळाकडे जमा करण्यात येईल.

(२) कोणत्याही उद्दिष्टांमुळे कोणताही निव्वळ तोटा येत असेल तर, तो केवळ राज्य शासनाकडून सोसला जाईल.

**भांडवली खर्चात व्याज आकार आणि इतर खर्च मिळवणे आणि जमा रकमा त्यातून वजा करणे.**

**३५.** महामंडळाला जर तोटा झाला असेल तर भांडवली खर्चात व्याज आकार आणि इतर खर्च मिळवण्यात येईल आणि सर्व जमा रकमा अशा भांडवली खर्चातून वजा करण्यासाठी असल्याचे समजण्यात येईल.

**घसारा निधी.**

**३६.** (१) महामंडळास भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दराने व अशा अटींवर राज्य शासनाशी विचारविनिमय करून घसारा निधीसाठी तरतूद करता येईल.

(२) अशी तरतूद करण्यात आल्यानंतर, कलम ३४ च्या प्रयोजनार्थ निव्वळ नफा निश्चित करण्यात येईल.

३७. राज्य शासनाकडून कोणताही सुधार आकार लादण्यात आला असेल तेव्हा त्या सुधार आकाराचा महामंडळाच्या कार्याशी जेथवर संबंध येतो तेथवर त्यापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा हिस्सा महामंडळाकडे जमाखाती टाकण्यात येईल. राज्य शासनाकडून लादण्यात आलेल्या सुधार आकाराचे संविभाजन.

३८. (१) महामंडळ, प्रत्येक वित्तीय वर्षी विहित करण्यात येईल अशा तारखेपर्यंत, पुढील वित्तीय वर्षाचे वार्षिक वित्तीय निवेदन आणि कार्यक्रम तयार करील आणि मान्यतेसाठी राज्य शासनाकडे सादर करील, आणि राज्य शासनाला महामंडळाच्या अशा वित्तीय निवेदनाला व कार्यक्रमाला, महामंडळाने ते सादर केले असतील अशा स्वरूपात किंवा त्यात राज्य शासनाला योग्य वाटतील असे फेरफार करून मान्यता देता येईल. वित्तीय निवेदन आणि कार्यक्रम.

(२) वार्षिक वित्तीय निवेदनात, पुढील वित्तीय वर्षातील अंदाजित जमा आणि खर्चाच्या रकमा विहित स्वरूपात आणि तपशिलासह दर्शविण्यात येतील.

(३) त्या वित्तीय वर्षामध्ये मान्य केलेल्या कार्यक्रमांमध्ये फेरफार करण्यास महामंडळ सक्षम असेल :

परंतु, मंजूर अर्थसंकल्पामध्ये केलेले असे सर्व फेरफार आणि पुनर्विनियोजने पुरवणी वित्तीय निवेदनाद्वारे राज्य शासनाच्या निदर्शनास आणण्यात येतील.

(४) वार्षिक वित्तीय निवेदन आणि कामाचा कार्यक्रम आणि कोणतेही पूरक निवेदन असेल तर ते निवेदन त्यांची प्रत्येकी एक प्रत राज्य शासनाला मिळाल्यानंतर राज्य शासनाकडून शक्य तितक्या लवकर ती राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे मांडण्यात येईल.

३९. (१) महामंडळ, व्यवसाय आणि देवघेव यासंबंधातील लेखा पुस्तके, आणि इतर पुस्तके विहित नमुन्यात आणि विहित रीतीने ठेवील. लेखे व लेखापरीक्षा.

(२) महामंडळाची लेखापरीक्षा राज्य शासनाने भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून नियुक्त केलेल्या लेखापरीक्षकांकडून करण्यात येईल.

(३) वित्तीय वर्ष समाप्त झाल्यापासून नऊ महिन्यांच्या आत महामंडळ, त्याच्या लेखापरीक्षा झालेल्या लेख्यांची प्रत आणि लेखापरीक्षकाच्या त्यावरील अहवालाची प्रत राज्य शासनाकडे पाठवील.

(४) राज्य शासन, पोट-कलम (३) अन्वये त्याच्याकडे पाठविण्यात आलेले महामंडळाचे लेखे, व त्यावरील लेखापरीक्षा अहवाल शक्यतोवर, ते अहवाल ज्या वर्षाशी संबंधित असतील त्याच्या लगत नंतरच्या वर्षाच्या समाप्तीपूर्वी राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्याची व्यवस्था करील.

४०. (१) लगतपूर्वीच्या कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महामंडळाच्या लेख्यांची समवर्ती लेखापरीक्षा राज्य शासनाला योग्य वाटेल अशा व्यक्तीकडून करण्यात येईल असे आदेश राज्य शासनाला देता येतील. तसेच, कोणत्याही विशिष्ट व्यवहारांच्या किंवा व्यवहाराच्या वर्गाच्या किंवा मालिकेच्या आणि एखाद्या विशिष्ट कालावधीच्या संबंधातील महामंडळाच्या लेख्यांची राज्य शासनाला योग्य वाटेल अशा व्यक्तींकडून विशेष लेखापरीक्षा करून घेण्याचा, निदेश राज्य शासनाला देता येईल. समवर्ती आणि विशेष लेखापरीक्षा.

(२) पोट-कलम (१) अन्वये आदेश काढण्यात आला असेल अशावेळी, महामंडळ, असे सर्व लेखे, लेखापरीक्षेसाठी हजर करील किंवा करण्याची व्यवस्था करील आणि पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेल्या व्यक्तीला लेखापरीक्षेच्या प्रयोजनासाठी आवश्यक अशी माहिती पुरवील.

## प्रकरण सात

## संकीर्ण व पूरक तरतुदी

वार्षिक अहवाल व वित्तीय विवरण, इत्यादी सादर करणे.

४१. (१) महामंडळ, प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत त्याच्या मागील वित्तीय वर्षातील कामाचा विशेषतः पुढील बाबींच्या संदर्भातील वार्षिक अहवाल विहित करण्यात येईल अशा नमुन्यात तयार करील, आणि राज्य शासनाला सादर करील,—

(क) पाटबंधारे व लाभक्षेत्र विकास;

(ख) मृद व जलसंधारण;

(ग) पाणलोट विकास व व्यवस्थापन;

(घ) सामाजिक वनीकरण;

(ङ) पाणीपुरवठा;

(च) मनोरंजनाच्या सुविधा;

(छ) जमिनींचा वापर; आणि

(ज) क्षार पड जमिनीची कामे; आणि

(झ) महामंडळाचे इतर कार्यक्रम.

(२) महामंडळ, राज्य शासन वेळोवेळी मागणी करील त्याप्रमाणे, त्याचे कामकाज, मालमत्ता अथवा कामे किंवा कोणतेही प्रस्तावित काम किंवा योजना यासंबंधातील विवरणपत्रे, आकडेवारी, अहवाल, लेखे आणि इतर माहितीसुद्धा राज्य शासनाला पुरवील.

करार करणे, इत्यादी.

४२. महामंडळाच्या वतीने करण्यात आलेला मालमत्तेचा प्रत्येक करार व हस्तांतरणपत्र हे लेखी स्वरूपात असेल आणि विनियमांमध्ये तरतूद करण्यात येईल असा प्राधिकारी किंवा अधिकारी यांच्याद्वारे व अशा रीतीने ते करण्यात येईल.

सर्वसाधारण शास्ती.

४३. जो कोणी हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले कोणतेही नियम किंवा विनियम यांच्या तरतुदींचे उल्लंघन करील किंवा या अधिनियमान्वये काढलेल्या कोणत्याही नोटिशीचे, आदेशाचे किंवा आवश्यक बाबींचे अनुपालन करणार नाही त्याला दोषीसिद्धीनंतर, सहा महिने मुदतीच्या कारावासाची अथवा एक हजार रुपयांपर्यंत दंडाची अथवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

प्रवेश करण्याचा अधिकार.

४४. महामंडळाने सर्वसाधारणपणे किंवा विशेषरित्या प्राधिकृत केलेला महामंडळाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना सर्व योग्यवेळी कोणत्याही जमिनीवर किंवा जागेत प्रवेश करता येईल, आणि महामंडळाला कायदेशीरपणे त्याचे कोणतेही काम पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा या अधिनियमान्वये महामंडळाच्या अधिकारांचा वापर करताना किंवा त्याची कामे पार पाडताना करावयाच्या प्राथमिक किंवा आनुषंगिक अशा कोणत्याही सर्वेक्षणाच्या, तपासणीच्या किंवा अन्वेक्षणाच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेल्या गोष्टी करता येतील.

येणे रकमा जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करणे.

४५. हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा विनियम या अन्वये कोणताही आकार, मूल्य, खर्च, शुल्क, भाडे, भरपाई यांच्यापोटी किंवा अन्य कोणत्याही कारणापोटी अथवा महामंडळाशी केलेल्या कोणत्याही करारापोटी कोणत्याही व्यक्तीकडून महामंडळाला येणे असलेल्या किंवा महामंडळातर्फे वसुलीयोग्य असलेल्या सर्व रकमा आणि त्यासंबंधात भरलेला सर्व आकार किंवा केलेला सर्व खर्च वसुलीच्या इतर कोणत्याही पद्धतीस बाध न आणता महामंडळाने अर्ज केल्यानंतर जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य असेल.

४६. (१) या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा विनियम याद्वारे कोणत्याही व्यक्तीवर बजावणे आवश्यक असतील अशा सर्व नोटिसा, आदेश व इतर दस्तऐवज हे या अधिनियमात किंवा अशा नियमात किंवा विनियमात अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीजकरून पुढील बाबतीत रीतसर बजावण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :— नोटीस इत्यादी, बजावणे.

१९५६ चा १. (क) जिच्यावर नोटीस, इत्यादी बजावावयाची ती व्यक्ती कंपनी असेल त्याबाबतीत कंपनी अधिनियम, १९५६ याच्या कलम ५१ च्या तरतुदीनुसार ती बजावण्यात आली असेल ;

(ख) जिच्यावर नोटीस, इत्यादी बजावावयाची ती व्यक्ती भागीदारी संस्था असेल त्याबाबतीत जर तो दस्तऐवज, भागीदारी संस्थेच्या धंद्याच्या मुख्य ठिकाणी, संस्था ज्या नावाने व पद्धतीने धंदा करीत असेल त्या नावाने व पद्धतीने तिचा निर्देश करून पाठविला असेल आणि तो एकतर,—

(एक) टपाल दाखला घेऊन किंवा नोंदणीकृत डाकेने पाठविला असेल, किंवा

(दोन) धंद्याच्या उक्त ठिकाणी देण्यात आला असेल ;

(ग) जिच्यावर नोटीस, इत्यादी बजावावयाची ती व्यक्ती सांविधानिक सार्वजनिक निकाय किंवा महामंडळ किंवा सोसायटी किंवा अन्य निकाय असेल त्याबाबतीत, जर तो दस्तऐवज त्या निकायाच्या, महामंडळाच्या किंवा सोसायटीच्या मुख्य कार्यालयाकडे तिच्या सचिवाच्या, कोषाध्यक्षाच्या किंवा इतर प्रमुख अधिकाऱ्याच्या नावे पाठविला असेल ; आणि तो एकतर—

(एक) टपाल दाखला घेऊन किंवा नोंदणीकृत डाकेने पाठविला असेल, किंवा

(दोन) त्या कार्यालयास देण्यात आला असेल ;

(घ) इतर कोणत्याही बाबतीत जर तो, दस्तऐवज जिच्यावर बजावावयाचा त्या व्यक्तीच्या नावे असेल आणि तो,—

(एक) तिला दिला किंवा देऊ केला असेल ; किंवा

(दोन) अशी व्यक्ती सापडणे शक्य नसेल तेव्हा तिच्या राहण्याचे किंवा धंद्याचे शेवटचे माहीत असलेले जे ठिकाण असेल त्या ठिकाणी ठळक जागी लावला असेल किंवा तिच्या कुटुंबातील एखाद्या प्रौढ व्यक्तीला दिला किंवा देऊ केला असेल किंवा असा दस्तऐवज जिच्याशी संबंधित असेल त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या एखाद्या ठळक भागावर लावण्यात आला असेल ; किंवा

(तीन) त्या व्यक्तीला टपाल दाखला घेऊन किंवा नोंदणीकृत डाकेने पाठविला असेल.

(२) कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या मालकावर किंवा भोगवटादारावर बजावणे आवश्यक किंवा प्राधिकृत करण्यात आले असेल असा कोणताही दस्तऐवज हा, नाव व वर्णन यासह त्या जमिनीचा किंवा इमारतीचा (त्या जमिनीचे किंवा इमारतीचे नाव नमूद करून), यथास्थिति, ' मालक ' किंवा ' भोगवटादार ' असे संबोधून पाठविता येईल आणि,—

(क) अशा रीतीने संबोधित केलेला दस्तऐवज पोट-कलम (१), खंड (घ) अनुसार पाठविण्यात किंवा देण्यात आला असेल ; किंवा

२६



(ख) अशा रीतीने संबोधित केलेला दस्तऐवज किंवा अशा रीतीने संबोधित केलेली त्याची प्रत त्या जमिनीवरील किंवा इमारतीमधील एखाद्या व्यक्तीला देण्यात किंवा देऊ करण्यात आली असेल किंवा त्या जमिनीवर किंवा इमारतीमध्ये ती जिला देता येईल अशी कोणतीही व्यक्ती नसेल त्या बाबतीत तो दस्तऐवज त्या जमिनीच्या किंवा इमारतीच्या एखाद्या ठळक जागी लावण्यात आला असेल,

तर तो रीतसर बजावण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(३) या कलमानुसार भागीदारी संस्थेवर दस्तऐवज बजावण्यात आला असेल त्याबाबतीत तो दस्तऐवज प्रत्येक भागीदारावर बजावण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(४) कोणत्याही मालमत्तेच्या मालकावर कोणताही दस्तऐवज बजावणे शक्य व्हावे यासाठी, राज्य शासन किंवा यथास्थिति, महामंडळ यांना लेखी नोटिशीद्वारे त्या मालमत्तेच्या भोगवटादारास, कोणताही असल्यास, मालमत्तेच्या मालकाचे नाव व पत्ता नमूद करण्यास फर्माविता येईल.

सार्वजनिक नोटीस कशी जाहीर करावयाची.

४७. हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा विनियम या अन्वये द्यावयाची प्रत्येक सार्वजनिक नोटीस ही, लेखी व संबंधित अधिकाऱ्याच्या सहीने दिलेली असेल आणि तिचा परिणाम होईल अशा वस्तीत किंवा कृषि क्षेत्रामध्ये किंवा इस्टेटीमध्ये मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी देण्यासाठी उक्त वस्तीत किंवा कृषि क्षेत्रात किंवा इस्टेटीमध्ये ठळक सार्वजनिक ठिकाणी तिच्या प्रती चिकटवून किंवा दवंडी पिटवून जाहीर करण्यात येईल आणि अधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही रीतीने जाहीर करण्यात येईल.

कर्तव्य पालन करण्यात कसूर.

४८. (१) या अधिनियमाद्वारे लादण्यात आलेले कोणतेही कर्तव्य पार पाडण्यात किंवा लादण्यात आलेले कोणतेही दायित्व पूर्ण करण्यात महामंडळाने कसूर केली आहे याबाबत राज्य शासनाची खात्री झाली तर, ते काम पार पाडण्यासाठी किंवा दायित्व पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाला मुदत निश्चित करता येईल आणि तदनुसार महामंडळाला नोटीस देण्यात येईल.

(२) अशा प्रकारे निश्चित केलेल्या मुदतीत असे काम पार पाडण्याच्या बाबतीत किंवा अशा दायित्वाची पूर्तता करण्याच्या बाबतीत महामंडळाने कसूर केली किंवा दुर्लक्ष केले तर, राज्य शासनाने, त्यास योग्य वाटेल अशा रीतीने महामंडळाचे अधिक्रमण करणे आणि त्याची पुनर्रचना करणे कायदेशीर असेल.

(३) महामंडळाचे अधिक्रमण केल्यानंतर आणि प्रकरण दोनमध्ये घालून दिलेल्या रीतीने त्याची पुनर्रचना करण्यात येईपर्यंत, राज्य शासन अथवा या प्रयोजनास्तव राज्य शासनाकडून वेळोवेळी नेमण्यात येईल असा एक किंवा अनेक अधिकारी अथवा अधिकारी मंडळ महामंडळाचे या अधिनियमाखालील अधिकार, कर्तव्ये व कार्ये पार पाडील.

(४) महामंडळाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, अशा अधिक्रमणाच्या मुदतीत, राज्य शासनाकडे निहित असेल.

कंपन्यांनी केलेले अपराध.

४९. (१) या अधिनियमाखालील अपराध जर एखाद्या कंपनीने केला असेल तर त्याबाबतीत तो अपराध घडला त्यावेळी कंपनीची प्रभारी असलेली व कंपनीचे कामकाज चालविण्यास जबाबदार असणारी प्रत्येक व्यक्ती तसेच ती कंपनीही त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानण्यात येईल व तिच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास आणि तदनुसार शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असेल :

परंतु, अशा कोणत्याही व्यक्तीने तो अपराध आपल्या न कळत घडला होता किंवा अपराध घडू नये म्हणून आपण योग्य ती सर्व दक्षता घेतली होती असे सिद्ध केले तर, या पोट-कलमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशा कोणत्याही व्यक्तीला शिक्षेस पात्र ठरविले जाणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील एखादा अपराध एखाद्या कंपनीने केला असेल व तो अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारी यांच्या संमतीने किंवा त्याने कानाडोळा केल्यामुळे किंवा दुर्लक्ष केल्यामुळे घडला आहे असे सिद्ध झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारीदेखील त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानण्यात येईल व त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्याप्रमाणे शिक्षा दिली जाण्यास तो पात्र ठरेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनाकरिता,—

(क) " कंपनी " याचा अर्थ निगम निकाय असा आहे व त्यात भागीदारी संस्थेचा, व्यक्तींच्या संघाचा अथवा व्यक्तींच्या संस्थेचा-मग ती विधिसंस्थापित असो वा नसो-समावेश होतो; आणि

(ख) भागीदारी संस्थेच्या संदर्भात " संचालक " याचा अर्थ त्या भागीदारी संस्थेतील भागीदार, असा आहे आणि व्यक्तींचा संघ किंवा व्यक्तींची संस्था यांच्या संदर्भात " संचालक " याचा अर्थ तिच्या कामकाजाचे नियंत्रण करणारा कोणताही सदस्य, असा आहे.

खटला भरण्याचा प्राधिकार.

**५०.** अन्यथा स्पष्टपणे तरतूद करण्यात आली नसेल तर, महामंडळाकडून किंवा महामंडळाने याबाबत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या व्यक्तींकडून तक्रार करण्यात आल्याखेरीज किंवा माहिती मिळाल्याखेरीज कोणत्याही न्यायालयाने महामंडळाच्या मालकीच्या किंवा अधिनियमान्वये किंवा तदनुसार महामंडळाकडे निहित असलेल्या मालमत्तेच्या संबंधात या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या अपराधाची दखल घेता कामा नये.

महामंडळाने अपराधांबाबत तडजोड करणे.

**५१.** (१) महामंडळाला किंवा महामंडळाने याबाबत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये शिक्षेस पात्र ठरविण्यात आलेल्या कोणत्याही अपराधांच्या बाबतीत एकतर कार्यवाही सुरू होण्यापूर्वी किंवा त्यानंतर, तडजोड करता येईल.

(२) अपराधांच्या बाबतीत तडजोड करण्यात आली असेल त्याबाबतीत अपराधी, अभिरक्षेत असेल तर त्यास सोडून देण्यात येईल आणि तडजोड केलेल्या अपराधाच्या बाबतीत त्याच्याविरुद्ध त्यानंतर कोणतीही कार्यवाही चालविण्यात येणार नाही.

अडथळा आणल्याबद्दल शास्ती.

**५२.** कलम ४४ अन्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींस कोणत्याही जमिनीत किंवा इमारतीत प्रवेश करण्यात अडथळा आणणाऱ्या किंवा असा प्रवेश केल्यानंतर अशा व्यक्तीस त्रास देणाऱ्या किंवा या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये तिला देण्यात आलेले कोणतेही अधिकार वैधरीत्या वापरण्यास अडथळा आणणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला अपराधसिद्धीनंतर सहा महिने पर्यंत असू शकेल अशा मुदतीची कारावासाची किंवा एक हजार रुपये दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा देण्यात येतील.

महामंडळाचे अधिकार सोपविणे.

**५३.** महामंडळास राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने या अधिनियमाखालील आपले कोणतेही अधिकार, राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यांकडे किंवा आपल्या कोणत्याही अधिकाऱ्यांकडे सोपविता येतील आणि याबाबतीतील सर्वसाधारण अथवा विशेष आदेशाद्वारे विनिर्दिष्ट अधिकार, आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांकडे पुन्हा सोपवण्यास त्याला परवानगी देता येईल.

**सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्यांना संरक्षण.**

५४. हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा विनियम या अन्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या अशा कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध, कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कारवाई दाखल करता येणार नाही.

**अध्यक्ष, कार्यकारी संचालक, सदस्य व अधिकारी, इत्यादी लोकसेवक असणे.**

५५. या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या किंवा विनियमांच्या कोणत्याही तरतुदीस अनुसरून कृती करणारे अथवा ती करीत असल्याचे अभिप्रेत असलेले अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक, आणि प्रतिनियुक्तीवरील किंवा यथास्थिति, महामंडळाचे अधिकारी आणि कर्मचारी हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. (१८६० चा ४५.)

**इतर कायद्यांशी विसंगत असलेल्या तरतुदी परिणामक्षम असणे.**

५६. या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत असे काहीही कोणत्याही अन्य कायद्यात अंतर्भूत असले, तरी या तरतुदी परिणामक्षम असतील.

**नियम करण्याचा अधिकार.**

५७. (१) राज्य शासनाला, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये केलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(३) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्यात कोणताही फेरफार करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील, तर असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल आणि अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून, तो नियम केवळ अशा सुधारित स्वरूपातच अंमलात येईल किंवा यथास्थिति, अंमलात येणार नाही. तथापि, अशी कोणतीही सुधारणा किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये त्यापूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाधा येणार नाही.

**विनियम करण्याचा अधिकार.**

५८. महामंडळास राज्य शासनाच्या पूर्वसंमतीने, या अधिनियमाद्वारे तरतूद करावयाच्या सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी आणि सर्वसाधारणपणे, महामंडळाच्या मते या अधिनियमान्वये त्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याची कामे पार पाडण्यासाठी तरतूद करणे आवश्यक असेल अशा अन्य सर्व बाबींसाठी हा अधिनियम व त्याखाली केलेले नियम यांच्याशी सुसंगत असे विनियम करता येतील.

**शंका आणि अडचणी दूर करण्याचा अधिकार.**

५९. या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही शंका किंवा अडचण उद्भवली तर, राज्य शासनास आदेशाद्वारे, ती शंका किंवा अडचण दूर करण्याच्या दृष्टीने त्यास आवश्यक व इष्ट वाटत असेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल अशी तरतूद करता येईल किंवा तसा निदेश देता येईल :

परंतु असे की, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

६०. (१) या अधिनियमान्वये ज्या प्रयोजनांसाठी हे महामंडळ स्थापन करण्यात आले आहे ती प्रयोजने मोठ्या प्रमाणात साध्य झाली आहेत याबद्दल राज्य शासनाची खात्री झाली व त्यामुळे हे महामंडळ चालू ठेवणे अनावश्यक आहे, असे शासनाचे मत झाले तर शासनाला राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून महामंडळ विसर्जित झाल्याचे घोषित करता येईल व तदनुसार महामंडळ विसर्जित झाल्याचे समजण्यात येईल आणि अशा विसर्जनानंतर सदस्य (अध्यक्ष असल्यास त्यांच्यासह) आपापली पदे सोडून देतील. महामंडळ विसर्जित करणे.

(२) उक्त तारखेपासून,—

(क) महामंडळाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, निधी किंवा त्याने वसुली करावयाच्या रकमा, राज्य शासनाकडे निहित होतील किंवा त्याने वसुली करण्याजोग्या ठरतील ;

(ख) महामंडळावर लादण्यायोग्य असलेली सर्व दायित्वे, राज्य शासनावर लादण्यायोग्य असतील.

२००० चा महा. अध्या. १३. ६१. (१) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ अध्यादेश, २००० हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कृती (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा केलेले नामनिर्देशन, नियुक्ती अथवा नियम यांसह) या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींअन्वये केलेली, काढलेली यथास्थिती केलेले असल्याचे मानण्यात येईल.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई